नि.फौ.ख.क्र.३०/२०२३
निशाणी १९

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,
माझे नाव – शिवानी शिवराम सावंत
वय सुमारे – ४६ वर्षे, व्यवसाय–गृहिणी
निवासस्थान–निवती, ता.वेंगुर्ला, जिल्हा– सिंधुदुर्ग.

**<u>सरतपास सहायक सरकारी वकील श्रीमती ए.ए.पवार यांच्या मार्फत सुरु–</u>**

०१. दि.१५/०४/२०२३ रोजी पोलीसांनी मला पंचनामा करण्याकरीता बोलविले नव्हते. माझ्यासमक्ष कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. (साक्षीदाराला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला.) सदर पंचनाम्यावर माझी सही असून त्यातील मजकूर मला माहीत नाही. **<u>(सहीस निशाणी पी–२/पीडब्ल्यू२ देण्यात येते.)</u> (सदर कागदातील मजकूर शाबीत करण्याची जबाबदारी अभियोगपक्षावर राहील.)**

**<u>सदर साक्षीदार सरकारी पक्षास सहाय्य करीत नसलेने त्यास सरकारी वकीलांनी उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली ती त्यांना देण्यात आली.</u>**

०२. हे म्हणणे खरे आहे की, दि. १५/०४/२०२३ रोजी घटनास्थळी माझ्यासोबत नरेंद्र रांजणकर हे हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी पुनम हिने आम्हाला त्यावेळी घटनास्थळ दाखविले. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे निवती मेढा येथील घर क्र. ४५ येथील आहे. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी त्यावेळी माझ्यासमक्ष बांबूचा दांडा जप्त केला होता. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरील घर हे पुर्वाभिमुखी असून ते कौलारु आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या उत्तरेस संतोष गोलतकर यांचे घर, दक्षिणेस मारुती गोलतकर यांचे घर, पश्चिमेस निवती मेढा येथील लोकांची राहती घरे व पुर्वेस म्हापण ते निवती जाणारा डांबरी रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा आमच्यासमक्ष तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा हा आम्ही घटनास्थळी वाचून पाहिला होता व त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याची खात्री झाल्यावर त्यावर आम्ही सही

केली होती. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी घटनास्थळी आमच्यासमक्ष पंचनाम्यामध्ये घटनास्थळाचा नकाशा काढला होता. हे म्हणणे खरे आहे की आरोपी माझ्या चांगल्या परिचयाचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की आरोपींना शिक्षा होवू नये या कारणास्तव मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री.एस.आर.ओगले यांच्यामार्फत सुरु–**

०३. फिर्यादी पुनम गोलतकर यांचे घरापासून मी राहत असलेले घर हे अंदाजे पाच ते दहा मिनिट चालत जाण्याच्या अंतरावरती आहे. निवती मेढा या वाडीमध्ये ५० ते ६० रहिवाशी घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की पुनम गोलतकर व माझे घर यामध्ये अनेक रहिवाशी घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी पुनम गोलतकर यांच्या सांगण्यावरुन मी पंचनाम्यावर सही केली व मी घटनास्थळावर प्रत्यक्ष हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की आरोपींच्या विरोधातील सर्व कथन मी उलटतपासादरम्यान खोटे सांगितले आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,
सही/–
(एस.जे.चिवटे)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.

दिनांक– १५/१०/२०२५